**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५३८ — विषय क्रमांक- ५३८

दिनांक - २४ /०७/२०२५ — विभाग- पाणी पुरवठा विभाग

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना सन २०२४-२०२५अंतर्गत प्र.क्र. ०८ मधील कल्याण रोड गणेशनगर पाण्याची टाकी ते खंडोबा मंदिरापर्यंत २०० एम .एम व्यासाची डी. आय तसेच १६० व ११० एम . एम व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे कामाचे प्राप्त दरास मंजुरी बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केलेल्या नुसार नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना २०२४-२०२५अंतर्गत प्र.क्र. ०८ मधील कल्याण रोड गणेशनगर पाण्याची टाकी ते खडोबा मंदिरापर्यत २०० एम एम व्यासाची डी आय तसेच १६० व ११० एम एम व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे या कामाची
ई.निविदा क्र. २१८००६८-१. दि.१४/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

या करिता दि २२/०५/२०२५ रोजी सदर निविदेचा स्क्रीन शॉट पाहिला असता त्यासाठी एकूण ०२ निविदा प्राप्त झालेल्या असल्याने सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडयात आला.

तदनंतर दि २०/०६/२०२५ रोजीच्या मा छाननी समितीच्या बैठकीत निविदा धारकाचे प्राप्त तांत्रिक कागदपत्रांची छाननी करून सदर निविदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता निविदाधारकांचे प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| **अ.न** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त)** | **प्राप्त निविदा दर** |
|---|---|---|---|
| १ | मे सुरज संदिप मोढवे. अहिल्यानगर | रू.२८.१४.०६३/- | रू . २९.५४.७६६/- (५% अधिक ) |
| २ | मे . अभिराज ट्रेडर्स अहिल्यानगर | रू. २८.१४.०६३/- | रू . ३०.९५.४६९/- (१०% अधिक ) |

करिता उपरोक्त नमूद दोनही निविदा धारकां पैकी मे.सुरज संदिप मोढवे, अहिल्यानगर यांचे सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले परंतू महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या द्रुष्टीने सदरचा देकार आणखी कमी करणे कामी मे.सुरज संदिप मोढवे, अहिल्यानगर यांचेशी दि ०१/०७/२०२५ रोजी वाटाघाटी करण्यात आली त्या मध्ये सादरचे काम आंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रू २८,१४,०६३/- (GST व्यतिरिक्त) या दराने करणेस तयार आहे असे इकडेस असे सादर केलेले आहे,करिता मे. सुरज संदिप मोढवे, अहिल्यानगर यांचेकडुन वाटाघाटी नंतरचे प्राप्त दरास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५३९ | विषय क्रमांक ५३९

दिनांक - २४ /०७/२०२५ | विभाग-सार्व. बांध.विभाग

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपलिका टि.पी. स्कीम नंबर ३ फायनल प्लॉट नं.८ स नं १४४ चाहुराणा बु. येथील व्यायामशाळा इमारत निर्लेखन करणे बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केलेल्या नुसार यापूर्वी मनपा निधीमधून टि. पी. स्कीम नंबर ३ फायनल प्लॉट नं.८ स नं १४४ येथील व्यायामशाळा इमारतीचे सुमारे १५ वर्षापूर्वी मनपाच्या खुल्या जागेत बांधकाम करण्यात आलेले होते. त्या कामाचा बाबतीत चा अहवाल खालील प्रमाणे आहे

कामाचे नाव - टि. पी. स्कीम नंबर ३ फायनल प्लॉट नं. ८ स नं. १४४ चाहुराणा बु. येथील व्यायामशाळा इमारत बांधणे

काम पूर्ण दिनांक-दिनांक १०/१०/२०१०

सदर ठिकाणी असणारे कर्मचारी व व्यायामशाळा वापरत असणारे नागरिकांचे वारंवार मागणीनुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी सदर बांधकामास वाळवी स्वरूपातील इमारत पूर्णपणे पोखरलेली आहे तसेच तेथील प्लास्टर देखील पडलेल्या स्वरूपातील असून कॉलमचे स्टील उघडे पडलेले आहे सदर कॉक्रीट वाळवी स्वरूपातील प्रकाराने कुमकवत झालेले आहे.

त्याकरिता मनपाच्या पॅनल वरील तेरा अभियंतांपैकी इंजि श्री. वैभव एम फिरोदिया यांनी इकडील मागणी नुसार स्ट्रक्चरल ऑडिट तथा इमारत सुस्थिती अहवाल देणेबाबत कळविले होते. सदर पॅनेल वरील रचना अभियंता यांनी सदर इमारत बाबत अहवाल खालील प्रमाणे दिलेला आहे.

"Building is structrually unsafe & unstable and its structural condition has deteriorated beyound the stage of economic repairs. The plastering work of the said Building is seen damaged and Water seepage from outside. The structural components of Building were unable to Inspect. The Structure is not therefore fit for human habitation and needs to the demolished after clearing it all of the occupants therein"

त्यानुसार सदरची व्यायामशाळा इमारत वापरा योग्य तथा रहिवास योग्य तथा इतर वापरायोग्य राहिलेली नाही. सदर इमारतीपासून केव्हाही जीवित वा वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव सदर इमारत मनपाची यंत्रणा लावून जमीनदोस्त करण्यास तसेच  यापूर्वी झालेल्या खर्चाचे निर्लेखनास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर  महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर  महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

| | |
|---|---|
| मा.प्रशासक ठराव क्र. ५४० | विषय क्रमांक ५४० |
| दिनांक - २४ /०७/२०२५ | विभाग-प्रभाग स.क्र.२ |

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका सार्वजनिक वॉर्ड नं. २६ बिल नं. १९६ (वेताळ बाबा मंदिर) थकबाकी निर्लेखित व बिलाची नोंद रद्द करणेबाबत

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, प्रभाग समिती क्र. २, वॉर्ड क्र.२६ यांची बिल नंबर १९६ (z२६०८८३९३) नांव नारायण भिवाजी सुपेकर वेताळ बाबा मंदिर ३० तोफखाना शहर अहिल्यानगर सदर जागा सार्वजनिक असलेने व कोणीही विश्वस्त नसल्याने सदर मालमत्ता कराचे बिल कोणी स्वीकरत नसलेने सदर बिलावरील रक्कम शास्तीसह निर्लेखीत करणेबाबतचा प्रस्ताव मान्य. तसेच विभागाने सदरची मालमत्ता सार्वजनिक असल्याने सदर मालमत्तेवर अहिल्यानगर महानगरपालिकेचे नाव लावावे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५४१ — विषय क्रमांक ५४१
दिनांक - २४/०७/२०२५ — विभाग-प्रभाग स .क्र. २

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका वॉर्ड नं. २६ बिल नं. ६१/A नाव :- श्री. निखिल सुरेश होगले भोग. विओम नेटवर्क लि. सदर जागेत टॉवर नसलेने सदर बिलाची आज अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे बाबत

--*--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, आहिल्यानगर मनपा वॉर्ड नं. २६ बिल नं. ६१/A सदर जागेत सन २०१८-२०१९ पासुन टॉवर नसल्याने टॉवर ची थकबाकी कोणी भरत नसल्याने सदर मिळकतीवर टॉवरची थकबाकी सन २०१७-२०१८ मध्ये शास्ती सह ८,८५,८३९ इतकी थकबाकी होती टॉवर कंपनी ने १,९२,३६५ भरलेली आहे ६,९३,४७४ इतकी थकबाकी होती टॉवर सन २०१८-२०१९ मध्ये काढलेले असल्याने ६,९३,४७४ थकबाकी तसीच ठेवुन राहिलेली थकबाकी निर्लेखित करणे बाबत.

| | मुळ रक्कम | शास्ती | एकुण |
|---|---|---|---|
| आज अखेर थकबाकी | १९४८९७३ | १६२६७२६ | ३५७५६९९ |
| २०१७-२०१८ थकबाकी | ५९३१२४ | १००३५० | ६९३४७४ |
| २०१८-२०१९ पासुन निर्लेखित करणे | १३५५८४९ | १५२६३७६ | २८८२२२५ |

सदर जागेत सन २०१८-२०१९ पासुन टॉवर नसल्याने टॉवर ची थकबाकी कोणी भरत नसल्याने सन २०१८-२०१९ ते २०२४-२०२५ अखेर शास्ती सह रु. २८८२२२५/- थकबाकी झालेली आहे. त्यामुळे मुळ रक्कम शास्ती सोडुन रु. १३५५८४९/- व त्यापुढील वार्षीक कर आकारणी वसुल न होणारी असल्याने निर्लीखीत करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५४२ — विषय क्रमांक ५४२

दिनांक - २४ /०७/२०२५ — विभाग--प्रभाग स .क्र. २

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका वॉड नं २६ बिल नं. १९९ सार्वजनिक (सिध्देश्वर मंदिर) थकबाकी निर्लेखित व बिलाची नोंद रद्द करणे बाबत

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, प्रभाग समिती क्र.२,वॉर्ड क्र.२६ यांची बिल नंबर १९९ (Z२२६०८८३३९६) नांव सिध्देश्वर मंदिरा तर्फे नामदेव ग्यानुजी पादिर ६८४० तोफखाना अहिल्यानगर (सिध्देश्वर मंदिर) सदर जागे मध्ये सिध्दी बाग म.न.पा. मालकीची आहे. सिध्देश्वर मंदिर हे सार्वजनिक असलेने व कोणीही विश्वस्त नसल्याने सदर मालमत्ता कराचे बिल कोणी स्वीकारत नसल्याने सदर बिलावरील रक्कम शास्तीसह निर्लेखीत करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५४३ — विषय क्रमांक ५४३

दिनांक - २४/०७/२०२५ — विभाग--प्रभाग स .क्र. २

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका वॉड नं. बिल नं. ७३३(१) नाव :- ललिता अंबादास बल्लाळ भोग. टॉवर व्हिजन इंडिया प्रा. लि. पुर्वीपासुन टॉवर नसलेने सदर बिलाची आज अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे व बिल रद्द करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, आहिल्यानगर महानगरपालिका वॉड नं. बिल नं. ७३३(१) नाव :- ललिता अंबादास बल्लाळ भोग. टॉवर व्हिजन इंडिया प्रा. लि. पुर्वीपासुन टॉवर नसलेने सदर मिळकतीवर टॉवर ची घरपट्टी कोणी भरत नसल्याने सन २०२४-२०२५ अखेर शास्ती सह रु. २४,१८,०७४/- थकबाकी झालेली आहे. त्यामुळे मुळ रक्कम शास्ती सोडुन रु. १४,८३,९१७/- व त्यापुढील वार्षीक कर आकारणी वसुल न होणारी असल्याने निर्लेखीत करण्यास मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
### मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -५४**

मा.प्रशासक ठराव क्र. ५४४ विषय क्रमांक ५४४

दिनांक - २४/०७/२०२५ विभाग--प्रभाग स .क्र. २

---

**विषय :-** आहिल्यानगर महानगरपालिका वॉड नं. ८ बिल नं. १०९९(Z२८०८२८५३ ) नावः- बिलावर नावाचा उल्लेख नाही सदर बिलाची जागा अस्तित्वात नसल्याने थकबाकी निर्लेखित करणे व बिलाची नोंद रद्द करणे

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, प्रभाग समिती क्र. २, वॉर्ड क्र.०८ यांची बिल नंबर १०९९ (Z२८०८२८५३ ) नावः- बिलावर नावाचा उल्लेख नाही सदर बिलाची जागा अस्तित्वात नसल्याने सदर बिलाची चुकून नोंद झालेली असल्याने व बिलावर नावाची नोंद नसल्याने कराचे बिल कोणीही स्विकारत नाही त्यामुळे थकबाकी कोणी भरत नसल्याने आज अखेर थकबाकी शास्ती सोडुन मुळ रक्कम १८५८७०/- व त्यापुढील वार्षिक कर आकारणी वसुल न होणारी असलेने सदर बिलावरील रक्कम शास्तीसह निर्लेखीत करणेबाबतचा प्रस्ताव मान्य. तसेच तद्पुर्वी विभागाने सदरची मालमत्तेवर नावाचा उल्लेख नसल्याने सदर मालमत्तेवर अहिल्यानगर महानगरपालिकेचे नाव लावावे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका